# नेत्रदान

नेत्रदानाचा संदेश
हृदयात जागवू या
संकल्प करु आजच
मरणोत्तर नेत्रदान करु या...

डोळ्यांच्या आकाशात
अंत:करणातले प्रतिबिंब
प्रतिबिंबात साकारले
नवजीवन स्वप्न

जीवनात मांगल्याची
प्रतिष्ठापना करु या
संकल्प करु आजच
मरणोत्तर नेत्रदान करु या...

दोन श्वासातले अंतर
जीवन मरणाचा हा फेरा
थांबले श्वास
संपले जीवन
मरणाचा सोहळा अमृतमय करु या
संकल्प करु आजच
मरणोत्तर नेत्रदान करु या...

-डॉ.सौ.सुधा कांकरिया

दृष्टी सर्वांसाठी..
साईसूर्य नेत्रसेवा
संशोधन आणि प्रशिक्षण